दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक १३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१४ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com



# महाविकास आघाडीचा भव्यदिव्य जनआक्रोश महामोर्चा

## केंद्र सरकारविरोधात नागरिकांची जोरदार घोषणाबाजी ; पोलीस बंदोबस्त तैनात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल – उरण महाविकास आघाडीतर्फे केंद्र सरकारच्या वाढत्या महागाई विरोधात जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला. पनवेल एस.टी.स्टॅन्ड येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून मोर्चाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर लाइन आळीमार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून सदर मोर्चा टपाल नाकामार्गे कापड बाजार आणि महानगरपालिका असा प्रांत कार्यलयासमोर जाऊन धडकला.**





यावेळी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. दिवसेंदिवस पेट्रोल, डिझेल, गॅस, इंधनांचे दर गगनाला भिडले आहेत. केंद्र सरकारच्या तपास यंत्रणांचा सतत गैरवापर, भाजपच्या नेत्यांचा भ्रष्टाचार, बैंक घोटाळा, विक्रांत घोटाळा आदी विषयांबाबत महाविकास आघाडीतर्फे केंद्र सरकारच्या नियोजनशून्य कारभाराचा जाहीर निषेध करण्यात आला. दरम्यान बाळाराम पाटील आणि प्रीतम म्हात्रे यांच्याहस्ते दुचाकी आणि गॅस सिलेंडरला लिंबू मिरचीचा हार घालून केंद्र सरकारच्या निर्बुद्धीची नजर उतरवण्यात आली. तसेच केंद्र सरकारच्या विरोधात नागरिकांनी जोरदार घोषणाबाजी करत हजारोंच्या संख्येने उपस्थिती दर्शविली.


यावेळी पनवेल–उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबनदादा पाटील, आमदार बाळाराम पाटील, राष्ट्रवादीचे सरचिटणीस तथा महाविकास आघाडीचे सचिव सुदाम पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, पनवेल जिल्हाप्रमुख शिरीष घरत, काँग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेंद्र घरत, जेष्ठ नेते जी.आर.पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रशांत पाटील, सतीश पाटील, सुरदास गोवारी, शेकाप नेते जे एम म्हात्रे, समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अनिल नाईक, शिवसेना पनवेल तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, शेकापचे विधानसभा अध्यक्ष काशीनाथ पाटील, महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, नगरसेवक गणेश कडू, रामदास पाटील, रामदास शेवाळे आदींसह महाविकास आघाडीचे नेते आणि हजारो कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थिती मोर्चा पडला.

यावेळी वरील सर्व नेत्यांच्या नेतृत्वाखाली पनवेल – उरण मधील कार्यकर्त्यांनी भाजपच्या जुलमी कारभाराचा निषेध नोंदविला. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदींची महागाईच्या जुमल्याविरोधात सुदाम पाटील यांनी केलेली नक्कल कार्यकर्त्यांना हत्तीचं बळ देऊन गेली. बाळाराम पाटील यांनी महाविकास आघाडीच्या नेत्यांसमोर तसेच कार्यकर्त्यांसमोर भाजपचा खरपूस समाचार घेताना सांगितले की, आपण आज अल्पो आहोत ते केवळ आणि केवळ भाजपचे लचके तोडण्यासाठी आलो आहोत, आणि आता ही वेळ आली आहे की, पनवेलमधील भाजप पक्षाचे लचके तोडण्यासाठी तयारीला लागा, असे बोलून त्यांनी उपस्थित नागरिकांचा आत्मविश्वास वाढविला.

## मुरुड स्वारगेट एस. टी. बसला भीषण अपघात ; ५० हून अधिक जखमी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड स्वारगेट एसटी बसला रेवदंडा अलिबाग मार्गावर श्री शारदा पेट्रोल पंपाजवळ जे.एस.डब्ल्यू. कंपनीच्या बसने समोरासमोर धडक दिली. या अपघातात ५० हून अधिक प्रवासी जखमी झाले. एसटी बस चालक गंभीर जखमी झाल्याने जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे. तर काही जखमी रुग्णांना तात्काळ ग्रामीण व काही रुग्ण जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



मुरुड आगारातून सकाळी सात वाजता सुटणारी मुरुड अलिबाग स्वारगेट या एसटी बसला अलिबाग तालुक्यातील बागमळा येथील श्री शारदा पेट्रोल पंपाजवळ जेएसडब्ल्यूची बस समोरा समोर धडक झाली आहे. यामध्ये बसमधील ५० हून अधिक जखमी झाल्या चे वृत्त हाती येत आहे. जखमींना जिल्हा रुग्णालय अलिबाग व संजीवनी हॉटेलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करीत आहेत. परंतु सकाळच्या सुमारास रेवदंडा अलिबाग मार्गवर इतका मोठा भीषण अपघात झाल्याने काही काळ वाहतुक कोंडी देखील झाली होती.

## पनवेल रेल्वे स्थानकातील वाहतूक विस्कळीत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पहाटेच्या वेळी पनवेल येथून सुटणाऱ्या रेल्वे अचानकपणे बंद पडल्याने नोकरी धंद्यानिमित्त नवी मुंबई, मुंबई व ठाणे परिसरात जाणाऱ्या चाकरमान्याचे चांगलेच हाल झाले होते.



मध्यरात्रीच्या सुमारास काही अज्ञात समाजकंटकांनी पोल नं.४८ येथील सिग्नलच्या वायर्स व लोकेशन बॉक्स तोडून ठेवले होते. त्यामुळे पहाटेची ४ ची पहिली गाडी वेळेत सुटली नाही. त्यामुळे रेल्वे प्रशासनाला हे समजताच त्यांची धावपळ सुरू झाली. परंतु त्या वेळेपर्यंत मोठ्या प्रमाणात प्रवासी रेल्वे स्थानकात जमा झाले होते. पनवेल रेल्वे पोलीस, एस.आर.पी.एफ, पनवेल शहर पोलिसांची पथके त्या ठिकाणी उपस्थित झाली व त्यंनी या घटनेची माहिती रेल्वेच्या वरिष्ठ अधिकारी वर्गाला दिली. तातडीने अधिकारी व कर्मचाऱ्यांचे घटनास्थळी येवून त्यांनी ही सेवा सुरळीत केली. साधारण सकाळी ७.१५ च्या दरम्यान ही वाहतूक पुन्हा सुरू झाल्याचे समजते. परंतु सकाळच्या वेळेस चाकरमानी मोठ्या संख्येने रेल्वे स्थानकात जमले होते. यावेळी जादा एस.टी.बस सेवा त्या ठिकाणावरुन सोडण्यात आल्याने गर्दीवरील ताण कमी झाला होता. त्या काळामध्ये फक्त खारघर ते बेलापूर अशी वाहतूक सुरू होती.

> ही घटना रात्रीच्या वेळेस घडली. त्यावेळी कुठल्याही रेल्वे धावत नव्हत्या. ४ ते ५ वर्षामध्ये ही प्रथमच घटना असून ह्या घटनेचे गांभीर्य समजताच रेल्वेचे संबंधित अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी पोहोचले व त्यांनी तातडीने त्या ठिकाणी जावून दुरुस्तीचे काम करण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे आता या मार्गावरील रेल्वे उशिराने धावत आहेत.
>
> **: शिवाजी सुतार मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी**

### संक्षिप्त...

## भुरट्या चोरट्यांचा मंदिरातील दानपेटीवर डल्ला



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा शहरातील नगरपंचायत जवळील मोठा मारूती, साई बाबा मंदिर व कासार आळीतील दत्त मंदीरातील अज्ञात चोराने दानपेटी फोडून पोबारा केला. या चोरट्यांनी दोन तीन दिवसांत हातसफाई केली असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

सदची घटना घडली असून गू.र.नोंद ३०/१२ एप्रिल २२ रोजी करण्यात आली असून मारूती मंदिरातील स्टीलच्या दान पेटीतून ९१०/– व दत्तमंदिर लाकडी पेटीतून ७००/– रू.लपांस केले एकूण १६१०/–असल्याचे अंदाज व्यक्त केला जात आहे.

अज्ञात चोरट्याला संशयित पकडला असून कबुली दिली आहे. अज्ञात चोरटा अज्ञान आहे. सदरचा तपास पोलीस निरीक्षक गोविंद ओमासे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास १२७५ पो.हवा.संजय शिंदे करीत आहेत

## बार्जवरील स्फोट प्रकरणी अखेर दोघांवर गुन्हा दाखल ; बेपत्ता कामगार सापडले

**दै.रायगड नगरी । उरण**

जेएनपीटी येथिल शॅलो वाटरबर्थ जवळील बार्ज मधील स्फोट प्रकरणी अखेर दोघा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.तसेच बेपत्ता झालेले दोन कामगार सोनारी गावात सापडले असल्याची माहिती खुद्द न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांनी दिली आहे.

सोमवारी ( दि११) रोजी सायंकाळी ६.३० च्या सुमारास गंगा बार्जवर स्फोट घडण्याची दुदैवी घटना घडली होती. या स्फोटात एक कामगार ठार तर दोन कामगार गंभीर रित्या जखमी झाले होते. परेश कन्स्ट्रक्शन एण्ड फाऊंडेशन प्रा.लि. या कंपनीची गंगा ही बार्ज जेएनपीटीच्या शॅलो वाटर बर्थ येथे उभी करण्यात आली होती. या बोटीचे मेन्टनन्स व पेंटीगचे काम शिपिंग सोल्यूशन या कंपनीला देण्यात आले होते. त्यावेळेस बार्जच्या एका कंपार्टमेंट मध्ये पेंटीग सूरू असताना रंगाच्या गॅसने पेट घेतल्याने हा स्फोट झाला. या स्फोटात अब्दुल सलाम हा कामगार जागीच ठार झाला. तर दोन कामगार गंभीर रित्या जखमी झाले होते. तसेच दोन कामगार बेपत्ता झाल्याचे सांगण्यात येत होते.

सदर बार्ज वर काम करताना सुरक्षेची कोणतीही काळजी न घेता हलगर्जी पणामुळे काम करून घेणारे शिपिंग सोल्यूशन कंपनीचे अशोक कुमार गिरवार सिंग आणि परेश कन्स्ट्रक्शन कंपनीचे सुरक्षा अधिकारी अमन जफर कोलताकर यांनी केले असल्याने त्याच्यावर भा.द.वि. कलम ३०४(अ), ३३७, ३३८, २८५ प्रमाणे गुन्हा


.../२




## नवीन पनवेलमध्ये पुलाचे उद्घाटन; विद्यार्थ्यांसह नागरिकांना सुविधा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती तथा विद्यमान नगरसेवक संतोष शेट्टी प्रयत्नांमुळे नवीन पनवेल येथील डीएव्ही शाळेजवळ पूल उभारण्यात आला आहे. या पुलाचे उद्घाटन महापौर डॉ. कविता चौतमोल आणि सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले. या वेळी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी विकासासाठी सातत्याने प्रयत्न करीत राहा, असे प्रतिपादन केले.



भाजपच्या सत्ताधारी नगरसेवकांमार्फत नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्याचे काम सुरू आहे. त्यानुसार नवीन पनवेल येथील डीएव्ही शाळेजवळ असलेल्या नाल्यामुळे या ठिकाणाहून जाणाऱ्या नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना त्याचा त्रास होत होता. पनवेल महापालिकेचे

.../२

## रस्त्याच्या मध्यभागी असणारे विजेचे धोकादायक खांब काढले, प्रितम म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील अमरधाम ते स्वा.सावरकर चौक या रस्त्याचे काँक्रीटीकरण पूर्ण झाले असून पथदिवे लावण्याच्या कामाला ही सुरवात झाली आहे. पण या रस्त्यावरील आशियाना सोसायटी आणि विरुपाक्ष हॉल समोरील विजेचे धोकादायक खांब काढण्यात आले नव्हते, त्यासाठी पनवेल पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी सतत पाठपुरावा करून या ठिकाणच्या विद्युत वाहिन्या भूमिगत कारण्यासाठी प्रयत्न केले. विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या प्रयत्नामुळे दोन्ही ठिकाणचे वाहतुकीस

> प्रभाग क्रमांक १८ मधील रस्ते पाठपुरावा करून आम्ही सिमेंट काँक्रिटीकरण करून घेतले आहेत. अजूनही काही काम प्रगतीपथावर आहे. पूर्ण झालेल्या रस्त्यांवरील पथदिवे सुद्धा लवकरच लावून घेण्यात येतील.
>
> **प्रितम जनार्दन म्हात्रे, विरोधी पक्ष नेता, पनवेल महानगरपालिका**



धोकादायक ठरत असलेले विद्युत खांब

.../२

# पोलादपूर अंडरपासच्या खंदकामध्ये तरूण पडला

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग पोलादपूर शहरातून अंडरपासच्या खंदकातून जात असताना सर्व्हिसरोडवरून पादचारी कोसळण्याची शक्यता मोठ्या प्रमाणात निर्माण झाली आहे. मंगळवारी रात्री चांभारगणी येथील एक तरूण तोल जाऊन अंडरपासच्या खंदकात कोसळल्यानंतर सुदैवाने अंडरपासमधील वाहतूक अद्याप सुरू झाली नसल्याने तरूण वाचला. मात्र, संभाव्य धोक्याची घंटा आधीच वाजल्याने तालुक्यात तीव्र नाराजी व्यक्त होऊ लागली आहे.

अरुण मोरवणकर हा कशेडी घाटातील चोळई येथील हॉटेल सायली ढाबा गार्डनमधील कर्मचारी पोलादपूर एसटी स्टँडकडे चालत येताना मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गासाठी खणलेल्या अंडरपासमध्ये घसरून कोसळला. त्याला मुकामार लागलेल्या अवस्थेत पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे पोलादपूरकरांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत असून भविष्यात अशाच प्रकारच्या घटना सातत्याने घडू शकण्याचा धोका स्पष्ट झाला आहे.

पोलादपूर येथील अंडरपासचा हा खंदक पादचाऱ्यांसह छोट्या वाहनांनादेखील धोकादायक ठरत आहे. यामुळे पोलादपूर पंचायत समिती ते तांबडभुवन साईनाथ मंदिरापर्यंत अंडरपास महामार्गाला भुयारी रस्त्यासारखे बंदिस्त स्वरूप देण्याची गरज असून अलिकडेच इंदापूरनजिक कशेणे येथे रायगड लोकसभा खासदार सुनील तटकरे यांनी केंद्रीय मुखपृष्ठ वाहतूकमंत्री ना. नितीन गडकरी यांच्याकडे पोलादपूर येथील सर्व पाचही पुल एकमेकांना जोडण्याची तातडीने गरज असल्याचे जाहिररित्या सांगितले आहे.

# चिरनेर-खारपाडा रोडवरील पात्रादेवी घाट लहान वाहनास धोकादायक

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुक्यातील चिरनेर – खारपाडा रोडवर अवजड कंटेनर ट्रेलर आणि दगडाची खडी, ग्रीट अवजड वाहतुक करणाऱ्या डंपरची संख्या अधिक प्रमाणात वाढली आहे. त्या डंपर मधून ग्रीट, खडी नियमित पडत असल्याने इंद्रायणी डोंगराजवळील पात्रादेवी घाटात वाहनाचा अपघातास कारणीभूत ठरु शकते.

मुंबई, ठाणे, नवीमुंबई येथून कोकणाकडे जाणारा हा सुलभ मार्ग आहे. या मार्गावर चोवीस तास चाकरमानी व पर्यटकांच्या वाहनांची वर्दळ सुरूच असते तसेच याच मार्गावरून खडी ग्रिटचे अवजड भरलेली वाहतूक होत आहे मात्र या अवजड खडी ग्रिटमुळे घाटा मध्ये रस्त्यावर सांडत आहे. त्यामुळे छोट्या वाहनांना विशेष करून मोटारसायकल स्वारांना याचा धोका जास्त प्रमाणात होत आहे. या आगोदर या ठिकाणी मोटारसायकल स्वारांचे अपघात होऊन जीव गमावले आहेत.

अवजड वाहतूक होत असतांना मात्र वाहतूक पोलिसांना या चिरनेर – खारपाडा रोडवरील पात्रादेवी घाटातील प्रकाराचा सूत मात्र पता नाही ही शोकांतिका आहे. तसेच या रस्त्यावरील जेएनपीटीतुन येणारे अवजड कंटेनर ट्रेलर यांची आर्शिया गोदामाकडे जाण्याची रुटिंग पळस्पेफाटा मार्गे असतांना वेळ आणि इंधन वाचविण्यासाठी बेकायदेशीरपणे चालणाऱ्या अवजड कंटेनर ट्रेलरची वाहतूक वाढली आहे. अशा अवजड वाहतुकीवर पोलिसांनी तात्काळ कारवाई करावी अशी मागणी येथील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# नदी किनारी दिसलेली चमकणारी वस्तु हाताळताना जोरात स्फोट एक जखमी

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव तालुक्यातील कळमजे गावचे हद्दीतील गोद नदी किनारी जोरात स्फोट एकजण जखमी पोलिस सुत्रांकडुन मिळालेल्या माहिती नुसार मंगळवार दि. १२ एप्रिल रोजी सकाळी ६.३० वाजताचे सुमारास कळमजे येथिल एक इसम काशिनाथ राजु कोळी याला नदी किनारी एक चमकणारी कांडी सदृष्य वस्तु दिसली, ती वस्तु हाताळताना अचानक तिचा जोरात स्फोट झाल्याने हाताला दणका लागुन तो जखमी झाला.

त्याला उपजिल्हा रुग्णालयात उपचारा साठी नेण्यात आले असुन केवळ हाताला जखम झाली असुन प्रकृती स्थिर आहे.

या घटनेची फिर्याद कळमजे येथिल रघुनाथ चंदर कोळी यानी पोलीस ठाण्यात दिली असुन या घटनेची नोंद अपघात रजि. नंबर ८/२०२२ प्रमाणे करण्यात आली आहे.

वरिष्ठ पो. नि. राजेंद्र पाटील यांचे मार्गदर्शनात या अपघाताचा अधिक तपास माणगांव पोलीस ठाण्याच्या म.पो.ना/७६ जाधव या करीत आहेत.

# गडब येथे कांळबादेवीची यात्रा ; देवकाठ्या स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील प्रसिध्द जागृत कांळबादेवीची यात्रा सालाबाद प्रमाणे दिनांक १५ एप्रिल रोजी गडब येथे असून ग्रामस्थ मौजे काराव गडब यानी यात्रेची तयारी केली असुन मोठ्या जल्लोषात या ठिकाणी यात्रा सपन्न होणार आहे.

या यात्रेनिमित्त सकाळी कांळबादेवीची विधिवत पुजा पालखी मिरवणुक व देवकाठ्या उभारणे. या यात्रेत देवकाठ्याची स्पर्धा हे मोठे आकर्षण असुन उंचच उंच देवकाठ्या उभ्या करण्यासाठी परीसरातील ग्रामस्थ ढोल ताशाच्या गजरात आपआपल्या देवकाठ्या घेवून या यात्रेत येतात जुनी जाणती जेष्ठ मंडळी सोबत तरुण सुध्दा या देवकाठ्या स्पर्धेत मोठ्या उत्साहाने भाग घेतात या देवकाठ्या कळकीचे बांबु, मोठे लाकडाचे वासे ऐकमेकावर बांधुन उंच देवकाठी बांधली जाते या देवकाठ्या मोठ मोठ्या वासाच्या तयार केलेल्या परांचीवर दोराच्या साह्याने उभी केली जाते देव काठी उभी करताना ग्रामस्थाचे एकीचे सामर्थ या ठिकाणी दीसुन येते देवकाठी उभी करणे व उतरणे या वेळी स्पर्धेत भाग घेतलेल्या ग्रामस्थाचा कस लागतो तर परांची वर चढलेल्या ग्रामस्थाला देवकाठी उभारताना व उतरवताना महत्वाची भुमिका बजवावी लागते तर देवकाठी स्थिर ठेवण्यासाठी देवकाठीची पागाणी पकडणार्यावर मोठी जबाबदारी आसते देवकाठी उभी राहल्यानंतरचा ग्रामस्थाचा जल्लोष पाहण्यासारखा असतो.

या जल्लोषात अगदी वयाच भान न ठेवता अबाल वृध्द देखील या जल्लोषात सहभागी होतात या यात्रेत पालणे, खेळण्यांची दुकाणे, मिठाईची दुकाणे आदी दुकाणे आसल्याने लहाण मुलांना या यात्रेचे विशेष आकर्षण आसते या यात्रेतील विशेष आकर्षण आसलेली देवकाठी स्पर्धा पाहण्यासाठी व कांळबादेवीचे दर्शन घेण्यासाठी नवस फेडण्यासाठी परिसराती भाविक भक्त तसेच मुंबई , ठाणे, पुणे आदी भागातील भाविक भक्त या यात्रेत येतात कांळबादेवीचे मंदिर मुंबई– गोवा महामार्गावर आसल्याने येथुन जाणारे पर्यटक अगदि विदेशी पर्यटक देखिल हि यात्रा व देवकाठ्या स्पर्धा पाहण्यासाठी आवर्जुण थांबुन यात्रेत सहभागी होतात.



# पेण येथील डॉ.शेखर धुमाळ राज्यस्तरीय आरोग्य भूषण पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । पेण**

जनसेवा हीच खरी ईश्वर सेवा या प्रमाणे वैद्यकीय क्षेत्रात अविरत सेवा देणारे व नेहमीच समाजसेवेत अग्रेसर असणारे पेण येथील डॉक्टर शेखर रामदास धुमाळ यांना सह्याद्री तर्फे आरोग्य भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे संपन्न झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यास नाशिकचे नगरसेवक राहुल दिवे, सह्याद्री उद्योग समूहाचे संस्थापक संदीप थोरात आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

पेण तालुक्यातील जोहे गावातील डॉक्टर शेखर रामदास धुमाळ हे मागील चाळीस वर्षे वैद्यकीय क्षेत्रात आहेत. मुंबई विद्यापीठात प्रथम आलेल्या डॉक्टर धुमाळ यांनी सुरुवातीला शासकीय रुग्णालयात सेवा केली. शासकीय सेवा करत असतानाच आपल्या जोहे हमरापूर विभागातील रुग्णांची होणारी परवड डॉ. धुमाळ यांनी बघितली व आपल्या गावात क्लिनिक सुरु केले. या क्लिनिक मध्ये येणाऱ्या गरीब रुग्णांच्या खिशात किती पैसे आहेत हे न पाहता प्रसंगी आपल्या खिशातील पैसे खर्च करुन रुग्णांना सेवा देण्याचे काम आज ही करत आहेत. कोरोना काळात देखील डॉक्टर धुमाळ यांनी जोहे, कळवे, दादर, हमरापूर, विभागातील जनतेसाठी रात्रंदिवस काम केले. वैद्यकीय क्षेत्राबरोबर गोरगरीब रुग्णांसाठी मोफत नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया, मूतखडासाठी वेगवेगळ्या उपाययोजना, संधीवातावर अनेक शिबिरे आयोजित करून गरीब रुग्णांना दिलासा देण्याचे काम केले आहे. यांसह शैक्षणिक क्षेत्रात देखील धुमाळ यांनी कार्य केले. हमरापूर विभागातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मिळावे म्हणून पहिली डॉ. आर.टी. धुमाळ इंग्लिश मिडीयम स्कुल ही इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु केली आहे.

वैद्यकीय क्षेत्राबरोबर, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात देखील डॉ.शेखर धुमाळ यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन त्यांना आता पर्यंत गुणिजन रत्न पुरस्कार, राष्ट्रीय पुरस्कार व गोवा रत्न पुरस्कारासह असंख्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. डॉक्टर शेखर धुमाळ यांना आरोग्य भूषण पुरस्कार मिळाल्याबद्दल पेण तालुक्यासह रायगड जिल्ह्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा अंतर्गत पनवेल मनपा आणि सीएससी मार्फत असंघटित कामगारांची ई श्रम ऑनलाईन नोंदणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाअंतर्गत पनवेल महानगरपालिका आणि सीएससी यांच्या मार्फत असंघटित कामगारांची ऑनलाईन नोंदणी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. या कार्यक्रमाची सुरूवात आज (१२ एप्रिल)कळंबोली येथील लेबर नाका,आंबेडकर भवन येथून करण्यात आली. यावेळी नाका कामगारांची ईश्रम ऑनलाईन नोंदणी करण्यात आली. या कार्यक्रमास उपायुक्त विठ्ठल डाके उपस्थित होते. त्यांनी यावेळी नोंदणी करताआलेल्या नाका कामगारांचा सत्कार केला. आज एका दिवसात कळंबोली येथे सुमारे १२५ कामगारांची नोंदणी याठिकाणी करण्यात आली.

आयुक्त श्री. गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली येत्या काही दिवसांमध्ये महापालिकेच्यावतीने कळंबोली, कामोठे, खारघर, पनवेल या चारही प्रभागामध्ये असंघटित कामगारांची नोंदणी करण्यात येणार आहे. कळंबोली येथून या नोंदणी कार्यक्रमाची आज सुरूवात करण्यात आली. नोंदणीकृत असंघटित कामगारांना शासनाच्या सामाजिक सुरक्षा व कल्याणकारी योजनांचा लाभ कामगार आयुक्तालयाच्या माध्यमातून मिळणार आहे. ईश्रम नोंदणीनंतर अपघाती मृत्यू किंवा अपंगत्व आल्यास २ लाख तर अंशतः अपंगत्व् आल्यास १ लाखाचा विमा मिळणार आहे.स्थलांतरीत कामगारांची माहिती ठेवणे शासनासाठी सुखकर होणार आहे. केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक ३१ डिसेंबर २००८ ला असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारीत केलेला आहे. या अंतर्गत असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचा डेटाबेस (NDUW) तयार करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार केंद्र शासनाने दि. २६ ऑगस्ट २०२१ रोजी असंघटित कामगाराची नोंदणी करण्याकरिता ई–श्रम पोर्टल कार्यान्वीत केले आहे. स्वयं रोजगार, घरेलु कामगार, असंघटित क्षेत्रात वेतनावर काम करणारे कामगार, फळ व भाजीपाला विक्रेते, वृत्तपत्रे विक्रेते, विडी कामगार, शेत मजूर, रिक्षाचालक, मुक्त पत्रकार, फेरीवाले व इतर सुमारे ३०० उद्योग व्यवसायातील कामगार तसेच संघटित क्षेत्रातील इतर कामगार ज्यांना कामगार कायद्याचे संरक्षण नाही असे कामगार नोंदणी करू शकतात.

याची नोंदणी करण्याकरिता पात्रता वय १६ ते ५९ वर्ष असून असंघटित क्षेत्रामध्ये काम करणारी कोणतीही व्यक्ती यामध्ये नोंदणी करू शकते. फक्त नोंदणी करणारे कर्मचारी हे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि कर्मचारी राज्य विमा योजनेचे सभासद नसावेत. या नोंदणीसाठी आधारकार्ड, बँकेचे पासबुक (राष्ट्रीयकृत बँक अथवा IFSC उेवश असलेली इतर कोणतीही बँक), स्वतः चा भ्रमणध्वनी क्रमांक अथवा कुंटुंबातील अन्य व्यक्तीचा भ्रमणध्वनी क्रमांक, ही कागदपत्रे आवश्यक आहे.तसेच स्वयं नोंदणीकरीता कामगाराचा भ्रमणध्वनी क्रमांक आधारकार्डशी लिंक असणे आवश्यक आहे.



पृष्ठ क्र.१ वरुन...

## बार्जवरील स्फोट प्रकरणी अखेर दोघांवर गुन्हा दाखल ; बेपत्ता कामगार सापडले

दाखल करून त्यांना अटक केली असल्याचे न्हावाशेवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक मधुकर भटे यांनी सांगितले तर बेपत्ता असलेले इतर दोन कामगार हे सोनारी गावातील त्यांच्या घरी सूखरूप असल्याचे देखिल त्यांनी सांगितले.

## नवीन पनवेलमध्ये पुलाचे उद्घाटन; विद्यार्थ्यांसह नागरिकांना सुविधा

माजी स्थायी समिती सभापती तथा विद्यमान नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या प्रयत्नांमुळे या नाल्यावर पूल उभारण्यात आला आहे. या पुलाचे उद्घाटन मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

यावेळी नगरसेवक राजू सोनी, समीर ठाकूर, नगरसेविका राजश्री वावेकर, डीएव्ही स्कूलच्या मुख्याध्यापिका चैतन्या रेड्डी, जितेंद्र तिवारी, अक्षय सिंग, शोभा सातपुते, कुलबीर चंडोक, आशा शेट्टी, विठाबाई सावंत, आर.पी. पाटील, शिवाजी भगत, देवेंद्र परब, श्याम शहा यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

## रस्त्याच्या मध्यभागी असणारे विजेचे धोकादायक खांब काढले, प्रितम म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश

काढून घेण्याचे काम पूर्ण करून घेण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

सावरकर चौक ते अमरधाम स्मशानभूमी या रस्त्यावर महावितरण कंपनीचे पोल रुंदीकरण झालेल्या रस्त्यात अडथळा निर्माण करत होते. हे विद्युतवाहिनी पोल याबाबत त्वरित कार्यवाही करणे गरजेचे असल्याचे विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी कळवले होते. त्यामुळे रस्त्याच्या मधोमध असणारे विजेचे खांब काढण्याची मागणी पालिका व महावितरणकडे करण्यात आली होती. विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांच्या पाठपुराव्याला यश आले असून विद्युत पोल काम हटवून भूमिगत करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

अमरधाम स्मशानभूमी जवळिल रस्त्यावर विद्युत पोल मधोमध असल्याने अनेक दुर्घटना घडल्या. यात वाहनाचे देखील नुकसान झाले होते. त्यामुळे येथे जीवित हानी होण्याची शक्यताही नाकारता येत नव्हती. या गोष्टी लक्षात घेऊन विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, नगरसेविका प्रीती जॉर्ज, डॉ. सुरेखा मोहोकर, सारीका भगत यांनी विद्युत वाहिनी भूमिगत करण्याची मागणी केली होती, या मागणीला यश आले असून विद्युत वाहिनी भूमिगत करण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी विरोधी पक्ष प्रीतम म्हात्रे यांचे आभार मानले आहेत.


## ग्रुप ग्रामपंचायत चिपळे

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि.१३/०४/२०२२

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत चिपळे हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.१४/०४/२०२२ ते २१/०४/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.२२/०४/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मौजे विहिघर स्मशानभूमी येथे पाण्याची व्यवस्था करणे | ३००००० | १५ वा वित्त आयोग |
| २ | चिपळे ग्रामपंचायत हद्दीतील पाणी पुरवठा बोअरवेलचे पुनर्भरण करणे | २००००० | १५ वा वित्त आयोग |
| ३ | मौजे चिपळे येथील माथेरान रोड ते दगडू हाल्या म्हात्रे यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | १२३२६९ | १५ वा वित्त आयोग |
| ४ | मौजे चिपळे येथील चंद्रकांत पाटील ते प्राथमिक शाळापर्यंत रस्ता तयार करणे | २०९२७६ | १५ वा वित्त आयोग |
| ५ | अरिहंत सोसायटी ते रॉयल मिडोज सोसायटी गटारावर स्लॅब टाकणे | २००००० | १५ वा वित्त आयोग |
| ६ | मौजे विहिघर येथील जनार्दन फडके ते तुकाराम फडके, धर्मा फडके यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | ५००००० | ग्रामनिधी |
| ७ | मौजे चिपळे येथील दिनकर चाहू पाटील ते मनोहर पाटील यांच्या घरापर्यंत पाईप गटार टाकणे | ३००००० | ग्रामनिधी |
| ८ | मौजे विहिघर येथील तलाव ते बाळाराम फडके यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे | ३००००० | ग्रामनिधी |
| ९ | मौजे विहिघर येथील स्मशानभूमी ते महालक्ष्मी सोसायटी पर्यंत रस्ता तयार करणे. | ७००००० | ग्रामनिधी |

**अटी व शर्ती :–**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये ५०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/–**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत चिपळे**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत चिपळे**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## नगरसेवक मनोहर म्हात्रे यांना पितृशोक



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महापालिकेचे माजी स्थायी समिती सभापती व विद्यमान नगरसेवक मनोहर म्हात्रे यांचे वडील माजी उपनगराध्यक्ष जानूशेठ कानाशेठ म्हात्रे यांचे मंगळवारी (दि. १२) सकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. धाकटा खांदा गणपती देवस्थानचे अध्यक्ष असलेल्या जानूशेठ म्हात्रे यांच्या निधनाचे वृत्त समजताच भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे, नगरसेवक-नगरसेविका यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी त्यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. कै. जानूशेठ म्हात्रे यांचा दशक्रिया विधी गुरुवारी (दि. २१) श्रीक्षेत्र नाशिक, तर उत्तरकार्य रविवारी (दि. २४) राहत्या घरी होणार आहे. त्यांच्या पश्चात त्यांचे भाऊ आणि मोठा परिवार आहे.

## नागोठणे गवळआळीतील श्री साईबाबा उत्सव व पालखी सोहळा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यातील गवळ आळी येथील शिवसह्याद्री मित्र मंडळ व ग्रामस्थ मंडळ गवळआळी यांच्यावतीने श्री साईबाबा उत्सव व पालखी सोहळा रविवार दि. १० एप्रिल रोजी रामनवमीच्या दिवशी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. गवळ आळीतील या श्री साईबाबा उत्सव व पालखी सोहळ्याचे हे सलगपणे १२ वे वर्ष होते. या पालखी सोहळ्यासाठी नागोठणे के. एम. जी. विभागातील ग्रामस्थ व साई भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गवळआळीतील श्री गणेश, राधाकृष्ण, श्री साईबाबा मंदिरात आयोजित करण्यात आलेल्या या श्री साईबाबा उत्सव सोहळ्याची सुरुवात सकाळी ठीक सात वाजता श्री साईबाबांना दुग्धअभिषेक घालून करण्यात आली. त्यानंतर अनेक धार्मिक पूजा विधी व होमहवन करण्यात आले. दुपारी ठीक १२.०० वा. श्री साईबाबांची महाआरती घेण्यात आली. यावेळी साई भक्तांच्या गर्दीने मंदिर फुलून गेला होता. या महाआरतीने संपूर्ण गवळआळी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. नंतर सायंकाळी ६ वाजता श्री साईबाबांच्या पालखीची वाजत गाजत सुरुवात करण्यात आली. ही पालखी संपूर्ण गवळआळीत फिरविण्यात आली. यावेळी सर्व आबाळ-वृध्दांनी पालखीत नाचण्याचा आनंद लुटला.

# १५ एप्रिल रोजी म्हसळ्याचे जागृत ग्रामदैवत श्री धाविर महाराज यांची यात्रा

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

गेली दोन वर्षे कोरोनाच्या महामारीमुळे म्हसळ्याचे जागृत ग्रामदैवत श्री धाविर महाराज यांची यात्रा होऊ शकली नाही त्यामुळे भाविकांमध्ये तीव्र नाराजी होती. मात्र ती नाराजी या वर्षी दूर होणार असून शुक्रवार दिनांक १५ एप्रिल २०२२ रोजी धावीर महाराजांची यात्रा संपन्न होत आहे.

श्री धाविर महाराजांचे मंदिर हे पूर्वमुखी असून रोजच धाविर महाराजांना सूर्यदर्शन होते. मंदिरात श्री धाविर देव,रवळनाथ, अवळनाथ, बापूजी, जोगेश्वरी, भैरी आणि काळेश्री यांचे जागृत स्थान आहे. या देवतांचे चांदीचे मुखवटे असून या पैकी काही देवस्थानाच्या जागा डोंगर कपारीत रमणीय ठिकाणी आहेत. म्हसळा येथे चैत्र पौर्णिमेला श्री धाविर महाराज यात्रेचे आयोजन करून या देवस्थानांना मानाने पालखीतून वतनदार, सालकारी, कुलकर्णी, आणि ग्रामस्थ मोठ्या श्रद्धेने,भक्ती भावाने मूळ देवस्थानी (श्री धाविर मंदिर) आणले जातात. म्हसळा येथिल श्री धाविर देव मंदिर यात्रेपासून तालुक्यातील इतर ठिकाणच्या यात्रांना सुरुवात होते, त्यामुळे म्हसळा येथील यात्रेला अनन्य साधारण महत्व आहे.



दरवर्षी चैत्र पौर्णिमेला संपन्न होणाऱ्या श्री धाविर महाराज यात्रेला तालुक्यातील ८४ गावातील लोकांचा सहभाग घुंगुर, लाइट आणि विविध पद्धतीने आकर्षकपणे सजविलेल्या काठ्या घेऊन यात्रेत सहभागी होतात.

सर्व समाज,सर्वधर्मीय बांधव यात्रेत सहभागी होऊन गावाच्या एकतेचे व अखंडतेचे प्रतिक दर्शविणारा हा अविस्मरणीय प्रसंग सर्वांच्याच कायम स्मरणात रहातो.केलटे गावातील काठीला यात्रेत प्रथम क्रमांकाचे स्थान असून या काठीची मानाची भेट होळीच्या खाचरात होते. त्यानंतर इतर गावाहून आलेल्या काठयांची गळाभेट श्री धाविर देव मंदिरात होते.

नवसाला पावणारे दैवत असून श्री धाविर देवांमुळे गावावर, शहरात कोणत्याही प्रकारचे संकट, कुठलीही साथ आगर कोणत्याही प्रकारची लागण होत नाही असे जुने-जाणते लोक आजही ठामपणे सांगतात. शहरातील कुंभार समाजाकडे या देवळाच्या पूजेअर्चेचे काम पूर्वापार असून शहरातील कुंभार समाजातील म्हशीलकार बंधू, वतनदार, सालकारी, मानकरी आणि ग्रामस्थ यात्रेची संपूर्ण जाबाबदारी पार पाडतात. यात्रेच्या मध्यरात्री गावातील रोहिदास समाजातील भक्तगणांकडून बळ काढून शीवबांधणी (वेशबांधणी) हा सोहळा श्रद्धेने पार पाडण्याची परंपरा आजही सुरु आहे. यात्रेसाठी पोलिस यंत्रणा आपली भूमिका अतिशय चोख आणि जबाबदारी पूर्वक पार पाडतात.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या १३१ व्या जयंती महोत्सवानिमित्त भीम गीतांनी आदरांजली

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती महोत्सावानिमित्त सामाजिक न्याय विभागामार्फत दि. १४ एप्रिल २०२२ रोजी सकाळी १०.०० वा. मंत्रालयासमोरील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण सभगृहात प्रसिद्ध गायक आनंद शिंदे यांच्या स्वरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



या कार्यक्रमास मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्री धनयंजय मुंडे, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री जयंत पाटील, वस्त्रोद्योग मत्स्यव्यवसाय, बंदरे तथा मुंबई शहरचे पालकमंत्री अस्लम शेख, सहकार, कृषि, सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. विश्वजित कदम, खासदार शरद पवार हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव सुमंत भांगे (भाप्रसे), डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) महासंचालक धम्मज्योती गजभिये आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती निमित्त राज्यभर दि. ६ ते १६ एप्रिल २०२२ या दरम्यान भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळया दरम्यान सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती सांगणारी चित्रफित प्रसिध्द करण्यात येणार आहे. तसेच या कार्यक्रमात सामाजिक न्याय विभागामार्फत अनुसूचित जाती मधील उद्योजकांना देण्यात येणाऱ्या मार्जिन मनी योजने अंतर्गत युवा उद्योजक, अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात विशेष अध्ययन करण्यासाठी देण्यात येणाऱ्या राजर्षी श्री शाहू महाराज शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी तसेच केंद्रीय लोकसेवा आयोग परिक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. सामाजिक न्याय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची यशोगाथा असलेली माहिती पुस्तिकेचे प्रकाशन यावेळी होणार आहे.

सामाजिक न्याय विभागा मार्फत प्रथमच सुरु केलेल्या महाविद्यालयातील अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी Equal Opporunity Centre समान संधी केंद्र संकल्पना यांचे प्राथमिक स्वरुपात उदघाटन देखील यावेळी केले जाणार आहे. अशी माहिती मुंबई विभागाच्या समाज कल्याण प्रादेशिक उपायुक्त श्रीमती वंदना कोचुरे यांनी एका प्रसिध्दी पत्रकान्वये दिली आहे.

## बेवारस मृतदेहाच्या नातेवाईकांचा पोलिसांकडून शोध

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातील पुष्पक नगर मुख्य संतुलन जलाशय (एमबीआर) या प्लॉट न.४६ सेक्टर १० या प्लांटच्या कंपाऊंडच्या बाहेरील बाजूस असलेल्या नाल्याच्या फुटपाथवर एक बेरावास बेशध्द अवस्थेत पडलेलाची माहिती पोलिसांनी मिळाली.

यावेळी पोलीस त्याठिकाणी गेले असता त्यांनी त्या इसमास उपचाराकरीता उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी त्यास तपासुन उपचारापूर्वीच मयत घोषित केले आहे. अनोळखी पुरूष वय अंदाजे ६० ते ६५, रंग काळ, उंची पाच फुट, चेहरा उमट, बांधा सडपातळ, डोके व दाढी वरील केस पांढरे, नाक सरळ व लांब, अंगात लाल पांढऱ्या रंगाचा हाफ टी शर्ट, व निळ्या रंगाची ट्रॅक पॅन्ट अशा वर्णनाचा इसमांबाबत माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गणेश फरताडे यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## जेथे स्त्रीचा सन्मान होतो, तेथे स्वराज्य घडत असतो : शितलताई साबळे महाराज



**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

प्रियेशी साठी ताजमहाल बांधणारे तुम्ही कितीतरी बघितले असतील पण रयेतेसाठी व आईसाठी स्वराज्य निर्माण करणारे एकमेव राजा म्हणजे छत्रपती शिवाजी राजा होता. म्हणूनच जेथे स्त्रीचा सन्मान होतो. तेथेच स्वराज घडत असतो.ज्यांच्या मुळे धर्म आहे.ज्यांच्यामुळे मी किर्तन करू शकते असे मत ह.भ.प. शितलताई साबळे महाराज (नगर ) यांनी महादेववाडी येथील अखंड हरीनाम सप्ताहात आयोजित किर्तन सेवेत देव जाणता देव जाणता । आपुलिया सत्ता एकाएकी ।। १।। देव चतुर देव चतुर । जाणोनी अंतर वर्ततसे ।। धु ।। देव निराळा देव निराळा । अलिप्त विटाळ तुका म्हणे ।। २।। या जगद गुरु तुकाराम महाराज यांच्या अभंगाच्या आधारे स्पष्ट केले.

जगात चार प्रकारची माणसे चतुर असतात एक नंबर देव, दोन छत्रपती शिवाजी महाराज, तीन नंबर बिरबल, चार नंबर माणूस, आरोपीला जेव्हा फाशीची शिक्षा होते. तेव्हा त्याला आदल्या दिवशी न्यायाधीश व वकील त्या आरोपीला कोणतेही शेवटची इच्छा विचारतात व ती पुर्ण करतात तेव्हा आरोपी न्यायधिशाला बोलतो.कि माझ्या जागेवर तुम्ही फाशी घ्या.तसेच चतुर बिरबल बादशहाचे प्रश्न झटक्यात सोडवतो, तसेच शिवाजी महाराज हे चतुर आहेत. तर यांच्या सर्वांच्या पेक्षा चतुर भगवान परमात्मा आहेअसे मत ह.भ.प. शितलताई साबळे यांनी वरील अभंगाच्या आधारे पटवून दिले. यावेळी गायनाचार्य ह.भ.प. रविंद्र मरवडे, गणेश दिघे,नरेश दळवी, मृदूंगमनी प्रसाद भऊर, ज्ञानेश्वर दळवी,विजयानंद महाराज तेलंगे,अनिल महाराज सानप,सुनिल भऊर,अक्षय ओव्हाळ,रविंद्र सागवेकर सरपंच, रंजना दळवी,चंद्रकांत बाईत,नथुराम बाईत, चंद्रकांत भऊर, धोंडू चितळकर, शांताराम बाईत, पांडुरंग बाईत,कोलाड-खांब परिसरातील तसेच रोहा तालुक्यातील असंख्य वारकरी, ग्रामस्थ मंडळ, श्रीराम मित्र मंडळ, नवतरुण युवक मंडळ, व समस्त महिला मंडळ महादेववाडी उपस्थित होते.

## अंकुश जाधव, राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित

**दै.रायड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील निवी गावचे सुपुत्र तथा शिक्षण क्षेत्रात एक सर्वोत्कृष्ट सेवा देणारे शिक्षक म्हणून सर्वपरिचित असणारे अंकुश जाधव यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. आतापर्यंत त्यांना दहावेळा हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

अ.भा.म. सा.परिषद मुंबई प्रदेश अंतर्गत मध मुंबई विभाग आयोजित ४ थे सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय साहित्य संमेलनात अंकुश नथुराम जाधव यांना राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. अंकुश जाधव हे शामल मोहन पाटील एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष श्री सतीश मोहन पाटील यांच्या न्यू इंग्लिश स्कूल कळंबोली विद्यालयात गेली १६ वर्षे कार्यरत आहेत.

ते एक दिव्यांग शिक्षक असून अत्यंत बुद्धिमान , प्रामाणिक, कष्टाळू व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांचे शैक्षणिक, सामाजिक, संस्कृती आदी क्षेत्रातील त्यांच्या या कार्याची दखल घेऊन श्री साई प्रतिष्ठान पुणे , राष्ट्रीय काव्यांगण लेखणीचे साहित्य मंच तथा सामाजिक संघटना, आणि राजनंदिनी बहुउद्देशीय संस्था आणि श्री राजपूत करणी सेना जळगाव आदी सामाजिक संस्थांनी आदर्श शिक्षक पुरस्कारानी गौरविले आहे.

अंकुश जाधव हे त्यांच्या उत्कृष्ट अध्यापन शैलीने विद्यार्थीवर्गात प्रिय शिक्षक आहेत.आज त्यांच्यावर सर्व स्तरातून तसेच ,न्यू इंग्लिश स्कूल विद्यालय मुख्याध्यापिका रोहिणी पाटील आणि सहकारी अध्यापक वृंद यांनी विशेष अभिनंदन केले,त्याचप्रमाणे त्यांचे विद्यार्थी, पालक, मित्र परिवार, निवी ग्रामस्थ, नातेवाईक यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे


**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given to the Public at large that our clients, M/s Aashutosh Enterprises, a duly registered Partnership Firm with offices at Shop No. 27, Laxmi Narayan Complex, Sector 12, Koparkhairne, Navi Mumbai – 400 709, as represented by its Partners, Shri Santosh Maruti Devkar, Shri Raju Mangilal Jain, Shri Lovmesh Dharmesh Patel and Shri Satan Hira Motho, are planning to purchase Plot No. 163, Sector 44, Nerul, Navi Mumbai – 400 706, District Thane, admeasuring ~949.18 square metres, allotted by CIDCO Ltd under the 12.5% Scheme vide File No 323 / Ghansoli, to the Original Allottee, Shri Khodadad Boman Irani as represented by his Power of Attorney Holder and Daughter Mrs. Persis Sunil Arora, vide Agreement to Lease dated 13 April 2022, duly registered with the Sub-registrar of Assurances, Thane-8, as Document No. 6686/2022 dated 13 April 2022. Our Client shall be executing a Tripartite Agreement with CIDCO Ltd and the Original Allottee in respect of the above Plot after publication of this Public Notice and after completing the due procedures.

Any person having any claim, rights, title, interest, ownership and / or any demand in the Plot described above, by way of sale, exchange, mortgage, charge, gift, trust, maintenance, inheritance, possession, lease, easement, occupation, lien or howsoever otherwise, are hereby requested to make the same known to the undersigned herein below, within a period of 15 days from the publication of this Public Notice, failing which the claims of any such person shall be deemed to have been waived off and / or finally abandoned.

Dated: 13 April 2022

Sd/-
**M/s. Vashi Advocates**
Office No. 528,
The Commodity Exchange,
Plot No. 2,3 & 4, Sector 19, Vashi,
Navi Mumbai- 400709
Email: vashiadvocates@hotmail.com
Mob: +91 93216 65960


## बाहे येथे हनुमान जयंती उत्सव सोहळ्याचे आयोजन

**दै.रायगड नगरी । खांब**

रोहे तालुक्यातील क्रुषीनिष्ठ बाहे गावामध्ये जय हनुमान ग्रामस्थ मंडळ बाहे यांच्या वतीने ता.१६ रोजी श्री. हनुमान जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने सुश्राव्य किर्तन तद्नंतर जागर भजन आदी कार्यक्रम संपन्न होणार आहेत.तर या सर्व जन्मोत्सव सोहळ्याचे यशस्वीतेसाठी जय हनुमान ग्रामस्थ मंडळ बाहे, महिला मंडळ व तरूण मंडळ बाहे अधिक मेहनत घेत आहेत.


**पनवेल महानगरपालिका**
**ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६**

Email ID : panvelcorporation@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२७४५८०४०/४१/४२

दि.१४/०४/२०२२

**निविदा सूचना**

| अ.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | PMC/WS/08/2022-23 | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील विहिरींची दुरुस्ती करणे. | रु.१९,८४,३५८/- |

वरील ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर दि.१८/०४/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(तृप्ती सांडभोर)
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका


## ठाण्याचे जिल्हा माहिती अधिकारी अजय जाधव यांना मातृशोक

**दै.रायगड नगरी । नवी मुंबई**



ठाणे जिल्हा माहिती कार्यालयाचे जिल्हा माहिती अधिकारी अजय जाधव यांच्या मातोश्री श्रीमती शकुंतला जाधव (वय ७९) यांचे आज दुःखद निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्यांच्यावर पनवेल येथील रुग्णालयात उपचार सुरु होते.

आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर मालेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.


मा.गोडसे सो

ॲड.रेखा होवाळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात
चौ.अर्ज क्र.५०५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१८/०६/२०२२

अंजना ज्ञानदेव पाडळे
वय : ५६ वर्षे, व्यवसाय : काही नाही
रा.फ्लॅट डी-३०२, शांतीकुंज सी.एच.एस.,
प्लॉट नं.१४-डी, सेक्टर ०४, खारघर-४१०२१० अर्जदार

विरुद्ध

१) मालती चेतन गायकवाड उर्फ मालती ज्ञानदेव पाडळे
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
२) गणेश ज्ञानदेव पाडळे
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) प्रवीण ज्ञानदेव पाडळे
वय : ३४ वर्षे, व्यवसाय : नोकरी
सगळे रा.फ्लॅट डी-३०२, शांतीकुंज सी.एच.एस.,
प्लॉट नं.१४-डी, सेक्टर ०४, खारघर-४१०२१० सामनेवाला

ज्यापेक्षा मयत श्री.ज्ञानदेव नामदेव पडळे यांचा मृत्यू दि.२९/०७/२०१९ रोजी खारघर येथे निधन झाले आहे. अर्जदार ही त्यांची पत्नी आहे आणि सामनेवाला १ ही मुलगी आहे व सामनेवाला २ आणि ३ हे मुले आहे. आणि अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

**SCHEDULE OF PROPERTY 'A'**

**Name of the Property Holder : Late Dnyandeo Namdeo Padale Flat No. D-302, 3 rd Floor, Shantikunj CHS Ltd, Plot No.14 D, Sec-04, Kharghar, admeasuring Area 495.29 Sq. Ft. Agreement Value Rs. 4,83,127/- (Rupees Four Lakhs Eighty Three Thousand One Hundred & Twenty Seven Only)**

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकती कळवाव्या. आणि या लेखी नोटीसवरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट अर्जदारास ह्याचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

तारीख १३ माहे ४ सन २०२२ बेलिफाकडे

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.मुजावर साहेब कोर्ट

ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.५३६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.१०/०६/२०२२

१) श्रीमती.शकुंतला नारायण म्हात्रे
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
२) श्री.विवेक नारायण म्हात्रे
वय : ३९ वर्षे, धंदा : व्यवसाय
३) श्री.किशोर नारायण म्हात्रे
वय : ३८ वर्षे, धंदा : नोकरी
४) श्री.अविनाश नारायण म्हात्रे
वय : ३२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.कोन, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी कै.नारायण नामदेव म्हात्रे हे दि.१०/०९/२०२० रोजी मौजे : एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच त्यांची आई कै.जनाबाई नामदेव म्हात्रे ह्या फार वर्षापूर्वी मयत झालेल्या आहेत. त्यांच्या मृत्यूची तारीख अर्जदार यांना सांगता येत नाही.

कै.नारायण नामदेव म्हात्रे यांच्या मालकीची असलेली व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णनाच्या मिळकती / बिअर शॉप चालविण्याचा परवाना आहे.

**मिळकतीचे वर्णन**

महाराष्ट्र दुकाने व संस्था नियम, १९६१ अन्वये नोंदणीकृत असलेला मौजे : कोन, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णनाचा बिअर शॉपचा परवाना

| नोंदणी क्र. | बिअर शॉपचे नाव | मालकाचे नाव | धंद्याचे स्वरुप | बिअर शॉप चालविण्याचा / धंद्याचा ठिकाणाचा पत्ता |
|---|---|---|---|---|
| एफ.एल. -बी आर/दोन क २९९/०९-१० | मेसर्स अविराज बिअर शॉप | नारायण नामदेव म्हात्रे | बिअर शॉप | घर नं.६४२, मु.पो. कोन, पो.अजिवली, ता.पनवेल, जि.रायगड |

सदर वर नमूद केलेल्या मिळकती / हॉटेल चालविण्याचे परवाने हे कै. नारायण नामदेव म्हात्रे यांच्या मालकीचे असून ते कै.नारायण नामदेव म्हात्रे यांचेच नावे आहेत.

वर नमूद केलेल्या मिळकती / परवाने बाबत कै.नारायण नामदेव म्हात्रे यांचे नावे असलेल्या सर्व परवाने अर्जदार यांचे नावे करून घेण्याकरिता अर्जदार यांना तसा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.व.स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीतील कै.नारायण नामदेव म्हात्रे यांचे मृत्यूपश्चात अर्जदार नं.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१३/०४/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## १९ एप्रिल रोजी कोकण भवन येथे संविधान जागृतीपर व्याख्यान

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंतीनिमित्त सामाजिक समता कार्यक्रमांतर्गत भारताचे संविधान आणि भारतीय नागरिकांचे कर्तव्य या विषयावर सामाजिक कृतज्ञता निधीचे कार्याध्यक्ष श्री. सुभाष वारे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. हा कार्यक्रम दि. १९ एप्रिल २०२२ रोजी समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे दुपारी ३.३० वाजता होणार आहे.

कोकण विभागातील अधिकारी, कर्मचारी, पत्रकार यांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे, कोकण विभागीय माहिती उपसंचालक डॉ.गणेश मुळे आणि राजपत्रित अधिकारी महासंघ कोकण विभाग शाखेचे सचिव डॉ. गणेश धुमाळ यांनी केले आहे.

## महेश साळुंखे यांनी केले मा. उपमहापौर जगदीश गायकवाड यांचे अभिनंदन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रिपब्लिकन पार्टीचे ऑफ इंडिया आठवले गटाचे कोकण प्रदेश अध्यक्ष जगदीश गायकवाड यांनी पनवेल मधील कामोठे वसाहतीमध्ये भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची चार दिवसाचा जयंती महोस्तव साजरा करण्याचा संकल्प केल्याबद्दल स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. सदर महोस्तव दि १४,१५,१६ व १७ एप्रिल २०२२ रोजी आयोजित केला आहे. या जयंती महोस्तवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संपूर्ण महाराष्ट्रात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणात जयंती महोत्सव आयोजित केल्या बद्दल स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष महेश साळुंखे यांनी भाई जगदीश गायकवाड यांचे अभिनंदन केले आहे. त्याचप्रमाणे स्वाभिमानीचे सर्व कार्यकर्ते जयंती महोत्सव यशस्वी करण्याकरिता सर्व सहकार्य करण्याचे आवाहन महेश साळुंखे यांनी केले आहे.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# माथेरान महिला काँग्रेसची मागणी : पाण्याचे अवाजवी दर कमी करण्यासाठी आ.महेंद्रशेठ थोरवे यांना साकडे

**दै.रायगड नगरी । माथेरान**

देशातील सर्वात महाग पाणी दर माथेरानला असून घरगुती वापरासाठी रु ४८, संस्थाना रु. ६२ तर हॉटेल्सना रु १६२ दर आकारण्यात येत आहेत हे अवाजवी दर कमी करण्यासाठी प्राधिकरणाला आर्थिक पॅकेज देण्याची माथेरान महिला काँग्रेसची मागणी असून याबाबत आमदार महेंद्रशेठ थोरवे याना नुकताच निवेदन देऊन यावर लवकरात लवकर मार्ग काढून माथेरान करांना यातून बाहेर काढावे अशी विनंती केली आहे.



मुंबई पासून हाकेच्या अंतरावर असलेले माथेरान हे सुप्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण शहराला पाणी पुरवठा करते. यासाठी नेरळ येथून उल्हासनदीचे पाणी अडीच हजार फूट उंचीवर पंप करून पुरावठा केला जातो. सदर पाणी पुरवठा स्कीमवर होणाऱ्या खर्चाच्या आधारे पाण्याचे दर प्राधिकरण निश्चित करते.

घरगुती वापराचे दर तीन टप्यात आकारले जातात पाण्याचा दर १००० लिटर मागे निश्चित केला आहे ० ते १५००० ली वापरासाठी रु २४.२० आणि यापुढे वापर केल्यास १५००० ते २५००० लिटर्स वापर केला तर रु ३६.२० व २५००० लिटर्स च्या पुढील वापरासाठी रु ४८.७० इतका आहे. शाळा व इतर संस्था रु ६२ , हॉटेल्स सी. क्लास रु १०७.२०, बी. क्लास रु १२८.५० ए. क्लास हॉटेल्स साठी रु १६२.४०. इतका दर आकारला जात आहे.

मुंबई शहराला देखील नाशिक , ठाणे जिल्ह्यातून पाणी पुरवठा केला जातो मात्र मुंबई महानगर पालिका चाली व झोपडपत्यांस रु ४ व उच्चभ्रू हौसिंग सोसायट्यांना रु ५.२० या दराने पाणी पुरवठा केला जातो. ह्या प्रचंड महाग दरातून दिलासा मिळावा यासाठी राज्य सरकारने दर वर्षी दीड ते दोन कोटी रुपयांची आर्थिक मदत प्राधिकरणाला करावी जेणेकरून पाण्याचे दसरा पन्नास टक्के कमी होऊ शकतील अशी मागणी माथेरान शहर महिला काँग्रेस कमिटी अध्यक्षा वर्षा शिंदे , सचिव सुहासिनी दाभेकर, नगर-सेवक शिवाजी शिंदे यांनी निवेदनाद्वारे स्थानिक आमदार महेंद्रसेठ थोरवे यांच्या कडे केली आहे.


शारलोट लेक या तलावातून माथेरान शहराला पाणी पुरवठा केला जातो मात्र या तल-ावाची क्षमता केवळ १४८ एमएलडी इतकी आहे दररोज ५ लाख लिटर इतके पाणी पुरवठा केला जातो व पर्यटन हंगामात मागणी वाढत ७ लाख लिटर पर्यंत जाते. कोरोनाच्या लॉक डाऊन मुळे येथील पर्यटन व्यवसाय मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे राज्य सरकारने विविध उद्योग धंद्यांना आर्थिक पॅकेज देऊन दिलासा दिला आहे पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी हा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी वर्षा शिंदे , सुहासिनी दाभेकर, माजी नगरसेवक शिवाजी शिंदे, राकेश

# पाली बस स्थानकाच्या बांधकाम दिरंगाईबाबत रवींद्रनाथ ओव्हाळ यांचे आमरण उपोषण

## लढा व्यापक करण्याचा दिला इशारा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

महाराष्ट्रातील प्रख्यात धार्मिक स्थळ असलेले अष्टविनायक तीर्थक्षेत्र व सुधागड तालुक्यातील मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या पालीतील बसस्थानकाची जुनी इमारत तोडून एक वर्ष उलटून गेले तरी देखील नवीन इमारत अजूनही बांधण्यात आलेली नाही. स्थानकाची प्रचंड दुरावस्था झाली आहे. यामुळे येथील प्रवासी व कर्मचारी यांची प्रचंड गैरसोय होत आहे. परिणामी बसस्थानकाच्या बांधकामात होणाऱ्या दिरंगाईबाबत सामाजिक कार्यकर्ते रवींद्रनाथ ओव्हाळ सोमवारी (ता.१८) पाली बस स्थानक आवारात आमरण उपोषणाला बसणार आहेत. रविन्द्र नाथ ओव्हाळ यांनी या प्रश्नावर अनेकदा आन्दोलनाची भूमिका घेतली होती, आता ते पुन्हा आक्रमक झाले असून याप्रश्री व्यापक लढा उभारणार आहेत. यासंदर्भातील निवेदन त्यांनी जिल्हाधिकारी रायगड, परिवहन विभाग पेण व संबंधित प्रशासनाला नुकतेच दिले आहे.



या निवेदनात रवींद्रनाथ ओव्हाळ यांनी सांगितले आहे की पाली बसस्थानकाच्या दुरवस्थेबाबत सन २०१६ सन २०१८ आणि सन २०२१ रोजी आमरण उपो-षणास केले होते. त्यावेळी त्यांना संबंधित कार्यालयाकडून पाली बस स्थानक लवकर बांधून पूर्ण करण्यात येईल याबाबत लेखी पत्राद्वारे आश्वासित केले गेले होते. या विनंतीला मान देऊन ओव्हाळ यांनी त्यांचे उपोषण स्थगित केले होते. मागील वर्षी २५ मार्च रोजी उपोषणा बाबतच्या सर्व मागण्या पूर्ण करण्याबाबत संबंधित प्रशासनाकडून लेखी आश्वासन दिल्यानंतर ओव्हाळ यांनी उपोषण स्थगित केले होते. त्यानंतर बसस्थानकाची धोकादायक इमारत तोडण्यात आली आणि स्थानक आवारात तात्पुरत्या स्वरूपाची निवारा शेड बांधण्यात आली. मात्र त्यानंतर एक वर्षे उलटून गेली तरी आजतागायत परिवहन महामंडळ अथवा कंत्राटदाराकडून तेथे कोणत्याही स्वरूपाचे काम सुरू करण्यात आलेले नाही. जुन्या इमारतीचे डेब्रिज तेथे तसेच पडले आहे. नाल्याचा स्लॅब तुटलेला आहे. शौचालय बंद आहे. स्थानक आवारात सांडपाणी व दुर्गंधी पसरली आहे. यामुळे प्रवासी व कर्मचाऱ्यांची प्रचंड गैरसोय होत आहे. म्हणूनच या गंभीर बाबीची दखल घेऊन ताबडतोब स्थानक दुरुस्त करून नवीन इमारत बांधकाम सुरू करावे अन्यथा आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा रवींद्रनाथ ओव्हाळ यांनी दिला आहे.

# पेट्रोलचे शंभर रुपये मागितल्याने लाकडी दांडक्याने केली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पेट्रोल भरलेले शंभर रुपये मागितले असता त्याचा राग आल्याने लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना किरवली पेट्रोल पंपावर घडली आहे. याप्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

९ एप्रिल रोजी रात्री पावणे बाराच्या सुमारास दोन इसम डिओ स्कुटी क्रमांक एम एच ४६ बीसी ३४३३ वरून पेट्रोल भरण्याकरता आले होते. त्यांनी गाडीमध्ये १०० रुपयाचे पेट्रोल भरले. त्यानंतर हरिकेश यादव याने पेट्रोलचे पैसे मागितले, त्यांनी पैसे देण्यास नकार दिला व शिवीगाळ करून मारहाण केली. त्यांनतर ते स्कुटी घेऊन पळून जात असताना यादव यांनी त्यांची स्कुटी पकडून ठेवली.


त्यानंतर स्कुटी पेट्रोल पंपावर सोडून तुला दाखवतो असे बोलून ते त्या ठिकाणाहून पळून गेले. काही वेळाने दोन्ही ईसम बाराच्या सुमारास त्यांच्यासोबत इतर पाच इसम व एक महिला घेऊन आले. त्यांनी यादव यास मारहाण करण्यास सुरुवात केली.

यावेळी हरिकेश यादव हा पळून त्यांच्या ऑफिसमध्ये गेला. त्यानंतर सात इसम व एक महिला असे त्याच्या रूमकडे गेले व रूमच्या बाहेर असलेला बच्चन यादव यास देखील मारहाण केली व ते पळून गेले. यात बच्चन यादव हा जखमी झाला आहे. त्याच्यावर साई मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल, उत्तरशिव येथे उपचार सुरू आहेत.

# आदर्शगाव भातसई येथील श्री महादेवी मातेचा १५ एप्रिल पालखी सोहळा १६ एप्रिल रोजी यात्रा उत्सव

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

भक्तांच्या हाकेला धावणारी व नवसाला पावणारी रोहा तालुक्यातील आदर्शगाव भातसई येथिल श्री महादेवी मातेचा पालखी व यात्रा-उत्सव शुक्रवारी १५ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता पालखी मिरवणुकीला भातसई गावातुन येशीच्या मंदिरातुन सुरुवात होणार आहे. पालखी नतंर झोलांबे कोपरे या गावात जाते. त्यानंतर पालखी झोलांबे गाव, लक्ष्मीनगर आदी ठिकाणी मिरवणूक करत सायंकाळी ७ वाजता आदर्शगाव भातसई गावातील भक्तगणांच्या घरोघरी भक्तीमय वातावरणात या महादेवीची पूजा करत मंदिरात येते.



तर दुस-या दिवशी शनिवारी १६ एप्रिल रोजी महादेवी मातेचा यात्राउत्सवाला सुरुवात होणार असून सकाळ पासुनच या ठिकाणी भक्त आपली मनोकामना पूर्ण झाल्याने नवस घेऊन मंदिरात वाजत गाजत हजेरी लावतात. रोहा तालुका तसेच रायगड जिल्ह्यातुन भक्तगणांचे अलोटजनसागर या महादेवी आईच्या यात्रेमध्ये सहभागी होतात. यात्रेचा मुख्य कार्यक्रम म्हणजे येथे आजही देवीचा पुजारी याला गळ लावून प्रदक्षिणा घातली जाते. यावर्षीचा गळ सायंकाळी ५-३० वाजता सुरुवात होणार आहे. एकूण सहा भक्ताना येथे गळ लावले जातात. त्यांपैकी एक भक्तांचा वरचा गळ लाटेला लटकवून एक फेरी फिरवली जाते. सदरच्या या भक्तिमय उत्साहला निडी, कोपरे, झोळांबे लक्ष्मीनगर, वरवडे पाले तर्फे अष्टमी, आरे बुंद्रुक, शेजारी गांवातील मानाच्या काट्या येतात. तर या पालखी व यात्रा उत्सवासाठी भाविकांनी उपस्थीत राहावे असे आग्रहच निमंत्रण आदर्श गाव भातसई, यात्रा उत्सव कमिटीने केली आहे.

# तळा तालुक्यात सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन

**दै.रायगड नगरी । तळा**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तालुकाआरोग्य अधिकारी तळा आयोजित प्राथमिक आरोग्य केंद्र/गो म.वेदक विद्यामंदिर तळा येथे सर्व रोग निदान शिबिराचेआयोजन सोमवार १८ एप्रिल २२ रोजी सकाळी ९ ते दु.३वा. पर्यंत होणार आहे. या शिबिराचे उद्घाटन आमदार मा.अनिकेत तटकरे विधान परिषद कोकण विभाग यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

केंद्र सरकार च्या सुचनेनुसार आझादी कि अमृत महोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात घेण्यात येत असून तळा तालुक्यातील रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्याच्या दृष्टीने तळा तालुका आरोग्य अधिकारी, एम् जी एम हॉस्पिटल कंळबोली, कामोठे, स्वदेश फाऊंडेशन लोणेरे माणगांव प्राथमिक आरोग्य केंद्र तळा यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात येत आहेत. या शिबिरात स्त्रीरोग, नाक कान घसा, बालरोग, अस्थीरोग दंत चिकित्सक, मिषक याआजारांवर तज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी केली जाणार आहे.

नाव नोंदणीसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र तळा, महागांव, मांदाड, येथे करावी रुग्णांनी आधार कार्ड, रेशनकार्ड घेऊन यावे. तरी रूग्णांनी लाभ घ्यावा व इतरांना हि सांगावे असे आवाहन उपसंचालक आरोग्य सेवा मुंबई ठाणे जिल्हा शल्य चिकित्सक सामान्य रुग्णालय, अलिबाग जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अलिबाग यांनी केले आहे.



म्हसळा येथील जागृत देवस्थान श्री धावीर देव महाराज पालखी सोहळ्याचे दर्शन घेताना सौ.मिनल महेंद्र ढवळे.

